"Education for Knowledge, Science and Culture."
– Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe
Shri. Swami Vivekanand Shikshan Sanstha's
VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR
(An Empowered Autonomous Institute)
2130 E, Tarabai Park, Tal. Karveer, Dist. Kolhapur 416 003
UGC Recognition Under 2 F & 12(B) UGC Act 1956
NAAC-Reaccredited "A+"CGPA 3.29
Affiliated to Shivaji University, Kolhapur (M.S.)
Ph.: 0231-2658612,2658840,Resi.: 0231-2653962 Fax:0231-2658840
Website :www.vivekanandcollege.org E-mail : info@vivekanandcollege.org

# वीर बाल दिवस निमित्ताने राष्ट्रीय सेवा योजना (NSS) अंतर्गत आयोजित कार्यक्रमाचा अहवाल

२६ डिसेंबर हा दिवस वीर बाल दिवस म्हणून साजरा केला जातो. हा दिवस गुरु गोबिंदसिंग महाराजांचे चार सुपुत्र — साहिबजादे अजीतसिंग, जुझारसिंग, जोरावरसिंग व फतेहसिंग यांच्या शौर्य, बलिदान आणि देशभक्तीच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. त्यांच्या अद्वितीय धैर्यापासून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी या उद्देशाने एनएसएस विभागामार्फत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

**कार्यक्रमाचे स्वरूप:**

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थनेने झाली. त्यानंतर कार्यक्रम अधिकारी यांनी वीर बाल दिवसाचे महत्त्व सांगितले. २६ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला, ज्यात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी भाग घेतला आणि राष्ट्रीय बाल पुरस्कार विजेत्या व देशभरातील विद्यार्थ्यांशी संवाद साधलाचा **व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली**. व्हिडिओद्वारे त्यांच्या शौर्य, त्याग आणि धैर्याचे प्रभावी दर्शन घडले. सादर कार्यक्रमासाठी मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित होते.

*(https://www.youtube.com/watch?v=RwmPlP_HsH0&t=1368s)*

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964

Bhorat
प्र. प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)





Photo 1: २६ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964




Photo 2 & 3: २६ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.



Photo 4: २६ डिसेंबर २०२५ रोजी नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे 'वीर बाल दिवस' साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची व्हिडिओ क्लिप विद्यार्थ्यांना दाखवण्यात आली.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empow... ...tonomous) ESTD JUNE 1964

प्र. प्राचार्य
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर
(अधिकारप्रदत्त स्वायत्त संस्था)

महाराष्ट्र शासन

**विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर**

राजाराम महाविद्यालय परिसर, विद्यानगर, कोल्हापूर ४१६ ००४

E-mail: jdhekop@gmail.com

फोन क्र. : (०२३१) २५३५४००, २५३५४५४ फॅक्स : (०२३१) २५३५४००

जा.क्र. : विसस/उशि/कोवि/आस्था/२०२५/E - २४९५१२० दिनांक :-२४.१२.२०२५

प्रति,

1. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2. कुलसचिव, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ,सातारा
3. कुलसचिव, वारणा समुह विद्यापीठ,वारणानगर ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर
4. प्राचार्य,सर्व अशासकीय अनुदानित कला, वाणिज्य, विज्ञान, विधी,शिक्षणशास्त्र व समाजकार्य महाविद्यालये,कोल्हापूर विभाग.

विषय :- वीर बाल दिवस 26 डिसेंबर 2025 साजरा करण्याबाबत.

संदर्भः-
1. संचालनालयाकडील पत्र क्र. उशिस/वीर बाल दि/2025/मवि-1/ई.2483280 दि.23.12.2025
2. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२५/ई.१४८८५०८/ विशि-५ दि.२२.१२.२०२५
3. शासन पत्र क्र. संकीर्ण-२०२५/प्र.क्र.१३०/साशि दि.२३.१२.२०२५
4. भारत सरकार यांचे महिला एवं बाल विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे दि. 16.12.2025 चे अर्थशासकीय पत्र

उपरोक्त विषयाबाबत संदर्भाकित पत्रांच्या प्रती सोबत जोडल्या आहेत. कृपया अवलोकनी घ्यावेत.

उपरोक्त विषयानुषंगाने कळविण्यात येते की, मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांनी ९ जानेवारी 2022 रोजी श्री गुरु गोविंदसिंहजी यांच्या प्रकाशपर्वाच्या निमित्ताने, दरवर्षी 26 डिसेंबर हा "वीर बाल दिवस" म्हणून साजरा करण्याची घोषणा केली आहे. शीख धर्माचे दहावे गुरु श्री गुरु गोविंदसिंहजी यांचे चार सुपुत्र साहिबजादे बाबा अजीतसिंह, बाबा जुझारसिंह, बाबा जोरावरसिंह व बाबा फतेहसिंह यांनी धर्म, स्वातंत्र्य, सत्य व न्यायाच्या रक्षणासाठी अलौकिक शौर्याने बलिदान दिले. विशेषतः अल्पवयीन साहिबजादे बाबा जोरावरसिंहजी (वय ८वर्ष) व बाबा फतेह सिंहजी (वय 6 वर्षे) यांनी धर्मांतरास नकार देत हौतात्म्य पत्करले, ही घटना भारतीय इतिहासातील अद्वितीय शौर्याचे प्रतीक आहे.

मा. पंतप्रधानांनी आपल्या संदेशात नमूद केले आहे की, " साहिबजाद्यांचे बलिदान देशातील बालकांमध्ये आणि युवकांमध्ये धैर्य, नीतिमूल्ये, आत्मसन्मान व देशभक्तीची भावना निमार्ण करण्यासाठी सदैव प्रेरणादायी राहील. या अनुषंगाने वीर बाल दिवसाचे औचित्य साधून युवकांमध्ये चारित्र्यनिर्मिती राष्ट्रनिष्ठा व नैतिक मूल्यांचा प्रसार करणे अपेक्षित आहे.

भारताचे मा. पंतप्रधान, श्री. नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत दि. 26 डिसेंबर 2025 रोजी भारत मंडपम, नवी दिल्ली येथे वीर बांल दिवस चा मुख्य कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे.

संदर्भाधिन शासन पत्रात दिलेल्या निर्देशानूसार दि.२६ डिसेंबर २०२५ रोजी वीर बाल दिवस साजरा करण्यात यावा व केलेल्या कार्यवाहीबाबतचा एकत्रित अहवाल आठ दिवसांत या कार्यालयाच्या rjdhekop@gmail.com. या ईमेल आयडीवर सादर करण्यात यावा.

Digitally signed by
PRAKASH DHONDU BACHHAV
Date: 24-12-2025 13:43:43

( डा.प्रकाश बच्छाव )
विभागीय सहसंचालक (उच्च् शिक्षण)
कोल्हापूर

सोबत :- वरिलप्रमाणे

प्रत :- मा. शिक्षण संचालक, (उच्च् शिक्षण),महाराष्ट्र राज्य् पुणे – 16 यांना माहितीस्त्व सविनय सादर